प्रादेशिक रुग्णालयांकरीता लोखंडी खाटा खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१९/प्र.क्र. १०१/आरोग्य-८
नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: १५ जून , २०१९.

संदर्भ-

१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/लोखंडी कॉट/प्रशा.मंजूरी/मा.आ/टे-२/६२३-६२४/१९, दिनांक २८.५.२०१९

२) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र,खरेदी २०१७/प्रक्र.१९९/आरोग्य-८ दि२४.१०.२०१७

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७

प्रस्तावना -:

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २८.५.२०१९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानूसार दिनांक २४.१०.२०१७ अन्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध अनुदानातून मनोरुग्णालयांतील रुग्णांकरीता २०४० खाटा खरेदी करण्यास प्रशासकिय मान्यता दिली होती,त्यास अनुसरून ५२७ खाटा खरेदी करण्यात आल्या आहेत,परंतु सदर कालावधीची मुदत संपुष्टात आले आहे,तसेच सन २०१७-१८ हे आर्थिक वर्षेही संपुष्टात आले आहे,सबब खरेदी केलेल्या ५२७ खाटांचा देयके अदा करण्यासाठी सन २०१९-२० मध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानातूनच भागविण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्याबाबत लेखाशिर्ष क्रमांक २२१०- वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१-नागरी आरोग्य सेवा- विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने ०५ मनोरुग्णाय (०५)(०१)-प्रादेशिक मनोरुग्णालये २१ पुरवठा व सामुग्री (२२१००२१७) या लेखाशिर्षार्तगत खरेदी करण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यासाठी सदर निधी लोकसभा निवडणूक आचारसंहितमुळे अर्थसंकल्पीय तरतुद न करता केवळ लेखानुदान मंजूर झाले आहे,आगामी (पावसाळी)अधिवेशनामध्ये औषध, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकिय उपकरणे खरेदीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद होणार आहे, राज्यातील प्रादेशिक रुग्णालंयाकरीता लोखंडी खाटा आवश्यक असल्याची बाब लक्षात घेता खरेदी करावयाच्य बाबींसाठी अर्थसंकल्पीय तरतुद तसेच वितरीत तरतुदीच्या मर्यादेतच प्रस्तावित बाबींच्या खरेदीचे आदेश देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कार्यक्रम प्रमुखाची राहिल,या अटिच्या अधिन राहून अर्थसंकल्पीय तरतूद रु.२,०३,९४,०००/-इतकी असून लेखानुदान रु,६६,०८,०००/-फक्त इतकेच असल्याने लोखंडी कॉट ५२७ नग खरेदी करण्यासाठी रुपये ६०,६०,०२५/-फक्त इतक्या रक्कमेची प्रशासकिय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती,

शासन निर्णय-

सन २०१९-२० च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये लोकसभा निवडणूक आचारसंहितमुळे अर्थसंकल्पीय तरतुद न करता केवळ लेखानुदान मंजूर झाले आहे,आगामी (पावसाळी)अधिवेशनामध्ये औषध ,तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकिय उपकरणे खरेदीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद होणार असल्याने राज्यातील प्रादेशिक रुग्णालंयाकरीता लोखंडी खाटा आवश्यक असल्याची बाब लक्षात घेता खरेदी करावयाच्य बाबींसाठी अर्थसंकल्पीय तरतुद तसेच वितरीत तरतुदीच्या मर्यादेतच प्रस्तावित बाबींच्या खरेदीचे आदेश देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कार्यक्रम प्रमुखाची राहिल,या अटिच्या अधिन राहून, दिनांक २४.१०.२०१७ अन्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध अनुदानातून मनोरुग्णालयांतील रुग्णांकरीता २०४० खाटा खरेदी करण्यास प्रशासकिय मान्यता दिली होती,त्यास अनुसरून ५२७ खाटा खरेदी करण्यात आल्या आहेत,परंतु सदर कालावधीची मुदत संपुष्टात आली आहे,तसेच सन २०१७-१८ हे आर्थिक वर्षही संपुष्टात आले आहे,सबब खरेदी केलेल्या ५२७ नग खाटांचे देयके अदा करण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये या प्रयोजनार्थ उपलब्ध असलेल्या अनुदानातूनच भागविण्यासाठी ५२७ नग रुपये ९७४५/- प्रती नग या अंदाजित किंमतीत (सर्व करांसहित)लोखंडी कॉट खरेदी करण्यासाठी लेखाशिर्ष क्रमांक २२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१-नागरी आरोग्य सेवा-विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने ०५ मनोरुग्णालय (०५)(०१)-प्रादेशिक मनोरुग्णालये २१ पुरवठा व सामुग्री (२२१००२१७) या लेखाशिर्षार्तगत रुपये ६०,६०,०२५/-रुपये साठ लाख साठ हजार पंचविस फक्त इतक्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

अटी-:

१) सदरहू लोखंडी कॉट खरेदी करण्याची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदर लोखेडी कॉटचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदर खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष क्रमांक २२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१-नागरी आरोग्य सेवा- विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने ०५ मनोरुग्णालय (०५)(०१)-प्रादेशिक मनोरुग्णालये २१ पुरवठा व सामुग्री (२२१००२१७) या लेखाशिर्षातंगत मंजुर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८) सदर यंत्रसामुग्रीच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

११) सदर निधी लोकसभा निवडणूकीच्या आचारसंहितमुळे सन २०१९-२० च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पीय तरतुद न करता केवळ लेखानुदान मंजूर झाले आहे,आगावी (पावसाळी)अधिवेशनामध्ये औषध ,तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकिय उपकरणे खरेदीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद होणार आहे, असल्याने प्रादेशिक रुग्णालंकरीता लोखंडी कॉट खरेदी आवश्यक असल्याने हि निकड लक्षात घेता खरेदी करावयाच्य बाबींसाठी अर्थसंकल्पीय तरतुद तसेच वितरीत तरतुदीच्या मर्यादेतच प्रस्तावित बाबींच्या खरेदीचे आदेश देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कार्यक्रम प्रमुखाची राहिल,

१२) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.६, नियम क्र.४० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१५१७४८१४४८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.06.17 15:50:30 +05'30'

(ज.स.तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. परेल, मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
६) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११) अधिक्षक, विभागिय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती/नाशिक
१२) निवडनस्ती (आरोग्य-८)